**ठळक बातम्या**

- राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५७व्या जयंतीनिमित्त त्यांना सर्वत्र अभिवादन

- माजी प्रधानमंत्री लाल बहादूर शास्त्री यांच्या १२२व्या जयंतीनिमित्त देशाची आदरांजली

- आशियाई क्रीडास्पर्धांमधे भारताची पदकसंख्या १२ सुवर्णांसह ७२

**आणि**

- महाराष्ट्रात समृद्धी महामार्गावर भीषण अपघातात सात जणांचा मृत्यू , तर २० जण जखमी

**<><><><><>**

देश आज राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५७व्या जयंतीनिमित्त तसंच माजी प्रधानमंत्री लाल बहादूर शास्त्री यांच्या १२२व्या जयंतीनिमित्त दोन्ही नेत्यांना आदरांजली वाहत आहे. यानिमित्त देशभरात अनेक ठिकाणी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत.

महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त आज सकाळी दिल्लीतल्या राजघाट इथं सर्व धर्म प्रार्थना सभा आयोजित करण्यात आली होती. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी तसंच लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्यासह अनेक मान्यवरांनी राजघाटावर बापूजींना आदरांजली वाहिली.

देशाला ‘जय जवान-जय किसान’ नारा देणाऱ्या लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, प्रधानमंत्री यांच्यासह अनेक मान्यवरांनी विजयघाट इथं पुष्पांजली अर्पण करून त्यांना आदरांजली वाहिली.

नवी दिल्लीतल्या संविधान सदनातही महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आलं. यावेळी प्रधानमंत्री मोदी, लोकसभेचे सभापती बिर्ला, मंत्रिमंडळातले नेते आणि इतर संसद सदस्य उपस्थित होते.

बांगलादेशातले भारताचे उच्चायुक्त दिनेश त्रिवेदी यांनी आज महात्मा गांधी आणि माजी प्रधानमंत्री लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन केलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या राजकीय कारकिर्दीला २५ वर्षं पूर्ण होत आहेत. 'जनसेवेतून देशसेवा आणि सतत समर्पणभाव' हा प्रवास आहे. सेवा आणि सुशासन या सूत्रांचा अवलंब करत २०४७ पर्यंत विकसित भारताचं उद्दिष्ट साकार करण्यासाठी सरकार सातत्यानं काम करत आहे. सर्वसमावेशक विकास आणि सामाजिक सक्षमीकरणाच्या माध्यमातून नागरिकांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडत आहेत. या विशेष मालिकेत आज आपण ऐकणार आहोत, **नक्षलवादी कारवायांच्या** निर्मूलनाविषयी...

**- - - होल्ड... व्हीसी- - -**

*(1967 मधे बंगालच्या नक्षलबारी जिल्ह्यात जमीनदार आणि ब्रिटीश सरकारच्या विरोधात सुरु झालेली सशस्त्र चळवळ स्वातंत्र्यप्राप्तीनंतर व्यवस्थाविरोधी बनली. देशाच्या खनिजसंपन्न भूभागात विशेषतः आदिवासी बहुल दुर्गम प्रदेशात नक्षल्याच्या दहशतीमुळे विकासाची फळं तिथल्या नागरिकांना चाखता आली नाहीत. डाव्या अतिरेकी कारवायांचा बीमोड करण्याचं उद्दिष्ट ठेवून केंद्रसरकारने त्यादिशेनं महत्त्वाची पावलं उचलली.*

*विश्वास, निर्माण, आणि जनकल्याण या त्रिसूत्रीवर आधारित कार्यक्रम राबवून राज्यसरकारांशी समन्वयानं नक्षलवादी कारवायांवर नियंत्रण मिळवण्यात सरकारला यश मिळालं.*

*आदिवासी भागातल्या नागरिकांचे प्रश्न सोडवणे, हिंसक कारवायांना बलपूर्वक आळा घालणे, शरण आलेल्या नक्षल्यांच्या पुनर्वसनासाठी निधी देणे अशा विविध मार्गांनी हा प्रश्न केंद्रसरकारने सोडवला.*

*जून२०२२ मधे राबवलेलं ऑपरेशन थंडरस्टॉर्म, सप्टेंबर २०२२ मधे ऑपरेशन ऑक्टोपस, डबल बुल, आणि चक्रबंध, तसंच २०२५मधे राबवलेलं ऑपरेशन ब्लॅक फॉरेस्ट, आणि गेल्या मार्चमधे राबवलेलं ऑपरेशन भीमबर्ग या मोहिमांमुळे नक्षली कारवायांना पायबंद बसला. त्याचवेळी नक्षली संघटनांना वित्तपुरवठा करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचा शोध घेऊन त्यांची नाकेबंदी करण्यात आली. राष्ट्रीय तपास यंत्रणा आणि सक्तवसुली संचालनालयामार्फत विविध कारवायांमधे सुमारे ९२ कोटी रुपये आणि इतर मालमत्ता जप्त करण्यात आली. शरण आलेल्या नक्षलींना मुख्यप्रवाहात आणण्यासाठी ५ लाखापर्यंत अर्थसहाय्य देण्यात आलं. तीन वर्षेपर्यंत दरमहा १० हजाररुपयांचा स्टायपेंडही दिला जातो. या विविध उपायांमुळे २०२४ ते २०२६च्या मार्च पर्यंत ३ हाजर ९२७ नक्षल्यांनी शरणागती  पत्करली. यातले*

*काही जण त्यांच्या संघटनांमधे वरिष्ठ पदावर होते, अनेक गुन्ह्यांमधे पोलिसांना हवे होते. नक्षलग्रस्त भागात पायाभूत सेवा सुविधा विकासाला चालना देणं, संपर्कयंत्रणा सक्षम करणं, तिथल्या युवकांना रोजगारक्षम बनवणं, असे उपायही राबवण्यात आले. परिणामी, नक्षली हिंसाचारात लक्षणीय घट झाली.२०१४ मधे नक्षलग्रस्त जिल्ह्यांची संख्या १२६ होती, ती २०२६मधे २वर आली आहे. ३१ मार्च २०२६ रोजी भारत नक्षलमुक्त झाल्याची घोषणा सरकारने केली.)*

**<><><><>**

फ्लायदुबईचे वैमानिक कॅप्टन स्मित मच्छार यांच्यावर हल्ला केल्याचा आरोप असलेल्या सहवैमानिकाला अबुधाबी इथं हलवण्यात आलं आहे. सौदी वृत्त संस्थेनं सौदी गृहमंत्रालयाच्या हवाल्यानं दिलेल्या माहितीनुसार वैद्यकीय तपासणीनंतर दोन्ही वैमानिकांना अबूधाबीला हलवण्यात आलं. कॅप्टन स्मित यांना संयुक्त अरब अमिरातीत आणलं असून त्यांची प्रकृती सुधारत असल्याचं भारतीय दूतावासानं कालच सांगितलं होतं.

दरम्यान, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज कॅप्टन स्मित यांच्याशी संवाद साधला. स्मित यांच्या शौर्याची आणि प्रसंगवधानाची प्रधानमंत्र्यांनी प्रशंसा केली आणि त्यांना लवकरात लवकर बरं वाटावं अशी कामना केली.

**.... होल्ड- बाईट- प्रधानमंत्री- - -**

यावेळी स्मित यांनी विमानातला घटनाक्रम प्रधानमंत्र्यांना सांगितला, आणि त्यांचे आभार मानले.

**<><><><>**

जागतिक शांततेसाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलेल्या अथक प्रयत्नांची रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी केलेली प्रशंसा प्रत्येक भारतीयासाठी अत्यंत अभिमानास्पद बाब असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा समाज माध्यमावरच्या संदेशात म्हणाले. महात्मा गांधींच्या जयंतीच्या दिवशीच पुतिन यांनी केलेलं हे कौतुक मोदींच्या नेतृत्वाखाली भारत जागतिक शांततेसाठी एक विश्वासार्ह आवाज म्हणून उदयाला आला आहे हेच अधोरेखित करतं असं शहा म्हणाले.

**<><><><>**

जपानमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी आजही आपल्या दमदार कामगिरीने विविध खेळांमध्ये पदकं मिळवली. मुष्टीयुद्धात लव्हलिना बोरगोनहेन हिने महिलांच्या ७५ किलो वजनी गटात सुवर्ण पदक पटकावलं. तिरंदाजीतही रिकर्व्ह प्रकारात भारतीय महिला संघाने आपलं पहिलं सुवर्ण पदक जिंकलं. अंकिता भकत, कीर्ती शर्मा आणि कुमकुम मोहोड या तिघींचा यात समावेश आहे. मिश्र रिकर्व्ह सांघिक तिरंदाजी प्रकारातही कुमकुम मोहोड आणि धीरज बोम्मदेवरा यांनी रौप्यपदक जिंकलं. पुरुषांच्या रिकर्व्ह सांघिक प्रकारात भारताच्या धीरज बोम्मदेवरा, यशदीप भोगे आणि नीरज चौहान यांनीही रौप्यपदक पटकावलं. नौकानयन स्पर्धेत डिंगी प्रकारात नेत्रा कुमानन हिने कांस्यपदक जिंकलं. या कामगिरीमुळे भारत पदकतालिकेत सहाव्या स्थानावर पोहोचला आहे. भारताची पदकसंख्या ७२ झाली असून त्यात १२ सुवर्ण, २५ रौप्य आणि ३५ कांस्यपदकांचा समावेश आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पदकविजेत्या खेळाडूंचं अभिनंदन केलं आहे.

<><><><>

मिझोराममध्ये आयझॉलजवळ कार खोल दरीत कोसळून दूरदर्शनचे वृत्त संचालक नम्पिबोउ मारिनमाई आणि पीआयबीचे अतिरिक्त महासंचालक एंगम पामे यांच्यासह तीन अधिकाऱ्यांचा मृत्यू झाला. जखमी कारचालकावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. शवविच्छेदनानंतर मृतदेह मणिपूरमधल्या त्यांच्या मूळ गावी पाठवण्यात येणार आहेत.

<><><><>

अमरावती जिल्ह्यात धामणगाव रेल्वेजवळ समृद्धी महामार्गावर मध्यरात्री झालेल्या भीषण अपघातात सात जणांचा मृत्यू झाला, तर २० जण जखमी झाले आहेत. शेगावाहून दुर्गादेवीची मूर्ती घेऊन वर्ध्याकडे जाणाऱ्या बोलेरो पिकअपला भरधाव ट्रकनं मागून धडक दिल्यानं हा अपघात झाला. मृत आणि जखमी वर्धा जिल्ह्यातल्या सिंदी मेघे इथल्या नवदुर्गा पूजा उत्सव समितीचे सदस्य आहेत. जखमींना धामणगाव ग्रामीण रुग्णालयातून सावंगी आणि सेवाग्राम रुग्णालयात हलवण्यात आलं असून, पाच जणांची प्रकृती गंभीर आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त करून मृतांना श्रद्धांजली वाहिली असून, जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी प्रार्थना केली आहे.

पोलीस या अपघातासंबंधी पुढील तपास करत आहेत.

**<><><><><>**

आकाशवाणीचे महासंचालक राजीव कुमार जैन यांच्या नेतृत्वाखाली आज नवी दिल्ली येथील आकाशवाणी मुख्यालयात ‘स्वच्छ भारत दिवस’ साजरा करण्यात आला. याप्रसंगी त्यांनी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना स्वच्छतेची शपथ दिली. या कार्यक्रमाचा भाग म्हणून त्यांनी महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांना पुष्पांजली वाहिली, तसेच परिसरातील स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला. ‘एक पेड माँ के नाम’ या मोहिमेअंतर्गत त्यांनी इतर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसोबत वृक्षारोपणही केले. यावेळी वृत्त विभागाचे अतिरिक्त महासंचालक एस. सुब्रमण्यन यांची उपस्थिती होती.

//<><><><><>//